# भारतीय संघराज्याचे बदलते स्वरूप

प्रा. सौ. छाया भारत सकटे, राज्यशास्त्र विभाग. शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद.

Email: sakatecb@gmail.com 9764864886

---

**गोषवारा**:-

भारतीय राज्यघटनेचा स्वीकार होऊन आता 71 वर्ष झाली आहेत. घटनाकारांच्या हेतूनुसार घटनेने तिचे काम चोख बजावले आहे. एखादी आदर्श घटना तयार केली, तरी तिची व्यवस्था कागदावरच प्रस्थापित होऊ शकते. तिच्या संस्थात्मक रचनेमध्ये जीव ओतून तिला जिवंत करून चालवण्याचे काम हे पुढच्या पिढ्यांनी करायचे असते. मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक उलथापालथी मध्ये घटनेची चौकट टिकून राहणे ही घटनेच्या टिकाऊपणाची एक परीक्षा असते. भारतीय घटना, भारतीय समाजाच्या आधुनिकीकरणाची शक्तिशाली प्रेरणा ठरली आहे. हे निश्चितच खरे असले तरी भारतीय राज्यव्यवस्थेतील संघराज्यव्यवस्थेत नेहमी चढ-उतार जाणवत आला आहे. भारतीय संघराज्यात सहकार्य व संघर्ष अशा दोन्ही बाजू समोर आल्या आहेत. भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणी पासून भारतात झालेल्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनाचा प्रभाव संघराज्य व्यवस्थेवर झालेला आहे व त्यानुसार संघराज्याचे स्वरूप बदलते राहिले आहे. भारतीय संघराज्याच्या स्वरूपातील बदल प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्यात आला आहे.

**संकेतशब्द**:- राज्यघटना, संघराज्य, लोकशाही, सहकार्य, संघर्ष, केंद्रीकरण, विकेंद्रीकरण, विलगतावाद, आधुनिकीकरण, सार्वभौमत्व, अभिजात सिद्धांत, सैद्धांतिक चौकट, एकात्मता, राष्ट्र, राज्य.

**प्रस्तावना**:-

भारतीय घटनाकारांनी राज्यघटनेमध्ये राष्ट्राची आदर्श तत्वे तर प्रस्थापित केलीच आणि शिवाय ती साध्य करण्यासाठी संस्था आणि त्यांच्या कार्यपद्धतीची ही रचना केली. ही रचना करताना राष्ट्रीय ऐक्य व एकात्मता आणि न्याय तसेच लोकशाही धारणी समाज निर्मिती हि राष्ट्राची ध्येय समोर होती. असा नवीन समाज घटनेमध्ये अंतर्भूत असलेल्या लोकशाहीच्या प्रेरणेतून निर्माण होणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक क्रांतीतून घडवायचा होता.प्रादेशिक,सांस्कृतिक, धार्मिक विविधता सांभाळून संघराज्य व्यवस्था व राष्ट्रीय ऐक्य यांची सांगड घालायची होती.

घटनेच्या उच्च प्रतीच्या केंद्रीभूत संघराज्य पद्धतीमुळे राष्ट्रीय एकात्मता साधली जाणार होती. या केंद्रीकणाचे पर्यावसन घटना अस्तित्वात आल्यानंतर दोन दशकांनी केंद्रीकरणाच्या अतिरेकामध्ये झाले. 1946 ते 1950 या काळामध्ये राष्ट्राच्या विकासासाठी एकसंघ भारत घडवण्यालाच सरकारचे आणि घटनाकरांचे सर्वोच्च प्राधान्य होते.घटना समितीमध्ये त्यावेळी केंद्रीकरणाचे पुरस्कर्ते आणि संघराज्याचे पाठीराखे यांच्यामध्ये जो तणाव होता तोच आजही तसाच अस्तित्वात आहे. याचे आश्चर्य वाटायला नको या खेचाखेचीला तोंड देण्यासाठी घटनेने अगदी भक्कम रचना दिलेली आहे. तिच्यामध्ये चांगल्या, हितकारक राजकीय वाढीला वाव ठेवला आहे. आणीबाणीच्या तरतुदीच्या झालेल्या वापराने ही संघराज्याच्या रचनेवर काही परिणाम झालेला नाही. पण असा संशय घ्यायला जागा आहे की,

केंद्र सरकार हे संसद आणि कायदा व्यवस्थेतली त्याची शक्ती किंवा सामर्थ्य वाढवत आहे. त्याच्या कारणाचा आढावा या शोधनिबंधात घेतला आहे.

संघराज्यवाद हे अशा प्रकारचे राजकीय तत्त्वज्ञान आहे, जे राज्यघटनेच्या माध्यमातून केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील अधिकाराचे विभाजन स्पष्ट करते. प्रत्येक संघराज्यात एकच केंद्रीय शासन असून घटक राज्य आणि केंद्र सरकार यांच्या करारातून संघराज्याची निर्मिती होते. संघराज्य या शब्दाचा उगम लॅटिन भाषेतील 'फेडरल' शब्दापासून झालेला असून फेडरल या शब्दाचा अर्थ 'करार' असा होतो. संघराज्य पद्धती ही केवळ संरचनात्मक व्यवस्था नसते, तर तिच्यात विविध लोकगट व त्यांच्या संस्था आपापली वैशिष्ट्ये कायम ठेवून काही समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी एकत्र येतात व व्यापक आधार असणारी शास्वत स्वरूपाची व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. यात सक्रिय सहकार्यातून निर्माण होणाऱ्या सहजीवनाशी असलेली बांधिलकी अभिप्रेत आहे. राजकीय संदर्भात विविध घटक आपली प्रादेशिक वैशिष्ट्ये व स्वायत्तता अबाधित ठेवून राष्ट्रीय ऐक्य प्रस्थापित करणारी कायमस्वरूपी राजकीय यंत्रणा प्रस्थापित करतात . अशा राष्ट्रराज्याला संघराज्य म्हटले जाते. संघराज्यवादाच्या अभिजात सिद्धांताचे प्रणेते म्हणून अलेक्झांडर हॅमिल्टन आणि जेम्स मॅडिसन यांचा उल्लेख करावा लागतो. या सिद्धांतात संघराज्य शासन प्रणालीचा उदय राज्या-राज्यांच्या करारातून झाला असे स्पष्ट नमूद करण्यात आले आहे.

**उद्देश**:-

१. भारतीय संघराज्य व्यवस्थेचा अभ्यास करणे.

२. भारतीयसंघराज्य व्यवस्थेतील बदलांचा अभ्यास करणे.

३. भारतीय संघराज्य व्यवस्थेतील बदलाला कारणीभूत घटकांचा अभ्यास करणे.

**भारतीयसंघराज्य**:-

भारतीय संघराज्याची रचना केंद्रोत्सारी स्वरूपाची आहे. तात्विक दृष्टिकोनातून भारतीय संघराज्याची रचना केंद्रोत्सारी स्वरूपाची आहे .असे जरी मानण्यात येत असले व केंद्र शासन आणि घटक राज्य यांच्यात अधिकाराचे विभाजन केलेले असले, तरी व्यावहारिक दृष्टिकोनातून भारतात एकात्मिक शासन पद्धती आहे. म्हणजेच घटक राज्यांचा राज्यकारभार सुरळीत व्हावा या दृष्टीने काही अधिकार दिलेले असले, तरी त्यावर केंद्र शासनाचे संपूर्ण नियंत्रण आहे.

भारतीय राज्यघटनेत संघराज्य या शब्दाचा उल्लेख कोठेही आढळत नाही. राज्घटनेच्या पहिल्या कलमात भारत हा एक 'राज्यांचा संघ' असेल असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे संघराज्य व्यवस्थेच्या सैद्धांतिक चौकटी पेक्षा भारतीय संघराज्य वेगळ्या प्रकारचे आहे. भारतीय संघराज्याच्या स्वरूपाबाबत राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडली आहेत. मायकेल स्टुअर्ट यांनी म्हटले आहे की,"भारत हे एकात्मता आणि संघराज्यात्मक पद्धतीचे मिश्रण आहे." तर प्रा. के. सी. व्हिअर यांनी म्हटले आहे की "भारतीय संघराज्य हे अर्ध संघराज्यात्मक पद्धतीचे आहे." भारतीय संघराज्यात संघीय व एकात्म असे दोन्ही विशेष एकत्र आले आहेत. या संदर्भात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी असे

म्हटले आहे:**"The political system adopted in the constitution, could be both unitary as well as federal according to the requirements of time and circumstances".**

**भारतीय संघराज्याचे वास्तव स्वरूप**:-

कोणत्याही संघराज्याचा विचार त्या देशाच्या राजकीय परिस्थितीच्या संदर्भातच करावा लागतो. भारतीय संघराज्याचा अभ्यास करताना ही तेथील राजकीय परिस्थिती विचारात घेणे जास्त आवश्यक आहे. भारतीय घटनाकारांना केंद्रीकरणावर भर देणे आवश्यक वाटते हे समजून घेणे ही तितकेच महत्वाचे आहे.

१. राष्ट्राचे ऐक्य व सार्वभौमत्व अबाधित राखण्यासाठी बाल्यावस्थेतील लोकशाही व्यवस्थेचे संरक्षण करण्यासाठी भारतीय संघराज्यामध्ये केंद्रीकरण स्वीकारलेले दिसते.

२. देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी.

समाजाच्या विविध विभागांना आपली वेगळी अस्मिता टिकवता यावी यासाठी घटक राज्यांना काहीप्रमाणात स्वायत्तता देणे आवश्यक होते. भारतीय घटनाकारांनी या दोन्ही गोष्टींचा समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. नवस्वतंत्र राष्ट्रापुढे उभ्या राहिलेल्या विविध समस्यांचा विचार करता घटक राज्यांना स्वायत्तता देत असताना देशाची केंद्रसत्ता दुर्बल होणार नाही याची खबरदारी घेणे महत्त्वाचे होते. केंद्रसत्ता दुर्बल राहिली असती, तर राष्ट्रीय ऐक्याला धोका उत्पन्न झाला असताया गोष्टीकडे घटनाकारांनी दुर्लक्ष न करता केंद्र प्रधान संघराज्याची निर्मिती केली. भारतीय संघराज्य पद्धतीचा विकास कसा झाला हे बघण्यासाठी काही महत्वाच्या विषयांचा परामर्श घ्यावा लागतो.

*अधिकारांचे वितरण

*केंद्राचे आणीबाणीच्या प्रसंगी अधिकार

*भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्न

*महसुलाचे वाटप

*राष्ट्रीय आराखडा

*संस्थानाचे संघराज्यामध्ये विलगीकरण

*घटनेतील सुधारणा व घटना दुरुस्ती प्रक्रिया

*राज्यसभेची भूमिका

भारतात अंतर्गत शांतता व सुव्यवस्था यासाठी संसदेने कायदे करून केंद्राला व्यापक अधिकार देण्याच्या प्रवृत्तीमुळे भारतीय संघराज्याचे केंद्रीकरणाकडे वाटचाल होताना दिसते. वाढते औद्योगिकरण नव्या अर्थव्यवस्थेचे गुंतागुंतीचे स्वरूप कल्याणकारी राज्याची संकल्पना व त्यातून वाढणारे कार्य व जबाबदारी, युद्ध किंवा युद्धजन्य परिस्थितीमुळे जनसामान्यांमध्ये निर्माण होणारी भीती व असुरक्षिततेची भावना, वाढता संरक्षण खर्च आणि व्यापार, संरक्षण व परराष्ट्र व्यवहार या विषयांना प्राप्त झालेले महत्त्व यामुळे घटक राज्यांचे केंद्र शासनावरील परावलंबित्व वाढत आहे. राज्यांना ज्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. त्याचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्याने निराकरण करण्याची क्षमता केंद्र शासनात आहे हा विचार प्रबळ बनतो आहे. अशा अनेक कारणांमुळे केंद्रीय करण्याची प्रक्रिया भारतीय संघराज्यात प्रबळ बनत चालली आहे हे खरे असले तरी या पद्धतीची उपयुक्तता कमी झालेली नाही.

**भारतीय संघराज्यातील वाढता संघर्ष** :-

केंद्र राज्य संबंधातील संघराज्य चौकटीत आज अनेक घटक राज्य आव्हाने देऊ लागली आहेत. यात काही घटक राज्यात फुटीरतावादी चळवळ, धर्माबाबत वाद काही घटक राज्यात विकासातील असमतोल काही घटक राज्यात सीमाप्रश्न संदर्भात तर काही घटक राज्यात पाणीवाटपाच्या प्रश्नाबाबत असंतोष निर्माण झालेला आहे. त्यामुळे घटक राज्यात लोक बाळाच्या आधारावर फुटून निघण्याच्या प्रवृत्तीला जोर येतो. सध्या पाण्यावरही राजकीय रंग पसरले आहेत. नैसर्गिक संपत्तीवर अनेक राज्य हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करताआहेत.नैसर्गिक संपत्ती व पाणी वाटप हा प्रश्न मुळातच राजकीय स्वार्थाच्या कक्षापलीकडचा आहे. परंतु तरी हे प्रश्न आज वादग्रस्त ठरत आहेत. पाणी प्रश्न देशाच्या अंतर्गत राजकीय व्यवस्थेला एकात्मतेला आव्हान देत आहेत. नवीन राज्यांच्या निर्मितीमुळे काही जुने प्रश्न सुटले तरी काही नवीन प्रश्न निर्माण झाले आहेत. या नवीन राज्यांना निसर्गाचे, खनिज संपत्तीचे वरदान लाभले आहे. मात्र त्यांच्या आधारे आपला विकास साधता येईल हे या राज्यांनी पाहिले पाहिजे. त्यामुळे वित्त आयोगाने या नव्या राज्यांच्या वित्तीय विभागणी विषयी काळजी ही आवश्यक आहे.

आधुनिक काळात जागतिक राजकारणाचा विचार करता बदलते जागतिक संदर्भ विचारात घेता संघराज्य शासन प्रणाली ज्या राज्यात आहेत त्या ठिकाणी विलगता वादे फुटीरतावादी शक्ती प्रबळ झाल्याचे स्पष्टपणे जाणवते आहे भारतीय संघराज्यात हे हा विलागता वाद निर्माण होतो आहे भारतीय राज्यघटनेच्या तरतुदीनुसार भारतीय संघराज्यातून फुटून निघण्याचा अधिकार नाकारले ला असला तरी भारतीय संघराज्यात वाद निर्माण झाला आहे व स्वतंत्र घटक राज्याची मागणी वारंवार होते आहे भारतीय संघराज्यात विलगता वाद निर्माण करणारे काही घटक नमूद करता येतात प्रादेशिकतावाद, भाषिक अस्मिता, धार्मिक मूलतत्त्ववाद, भोगोलिक असमानता, विकासातील असमतोल, राजकीय अभिलाषा यांचा उल्लेख करावा लागेल.

**केंद्र-राज्य संबंध संदर्भातील आयोग**:-

**१. राजमन्नार समिती**-1969 साली केंद्र-राज्य संबंधातील संघर्ष, तणाव कमी करण्याच्या हेतूने तमिळनाडू शासनाने ही समिती नियुक्त केली. या समितीने 1971 ला आपल्या कामकाजाचा अहवाल सादर केला या समितीने केलेल्या सूचना शिफारशी सर्व योग्य व उपयुक्त आहेत असे म्हणता येणार नाही. कारण राज्याची स्वायत्तता, सत्ता कशी वाढवता येईल हाच एकमेव हेतू या समितीच्या शिफारशी मागे असलेला दिसतो. परंतु राज्य मन्यार समितीने सुचवलेल्या काही शिफारशी उपयुक्त व आवश्यक वाटतात त्यात प्रामुख्याने राज्यपालाची नियुक्ती, राज्यपालाचे विशेषाधिकार, अर्थ मंडळाची आवश्यकता यांचा समावेश करावा लागतो.

**२.सरकारिया आयोग-** केंद्र-राज्य संबंधाचे परीक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या पुनर्रचनेचे संबंधी शिफारशी करण्यासाठी केंद्र सरकारने 1983 साली आर. एस. सरकारिया यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाची स्थापना केली.1988 ला या आयोगाने आपला अहवाल केंद्र सरकारला सादर केला. केंद्र व राज्य यांचे विविध क्षेत्रातील परस्पर अधिकार, कार्य, जबाबदाऱ्या यासंबंधीच्या घटनात्मक तरतुदी, देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण, राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक व आर्थिक

विकास, लोककल्याण तसेच केंद्र राज्य संबंधांना व त्यांच्या कार्यांना बाधा आणणारे कायदे यासंबंधी परीक्षण करून त्यावर उपाययोजना करण्या संबंधीच्या शिफारशी या आयोगाने केल्या.

३. **केंद्र-राज्य संबंध आयोग-** भारत सरकारने 27 एप्रिल 2007 रोजी भारताचे माजी सरन्यायाधीश मदन मोहन पुंच्छी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र-राज्य संबंधाबाबत आयोगाची स्थापना केली. भारतातील आर्थिक व्यवस्थाना मध्ये मोठ्या प्रमाणावर परिवर्तन झाले. सरकारसमोर प्रत्येक स्तरावर अनेक आव्हाने उभी राहिली. त्यामुळे प्रत्येक स्तरावर सापेक्ष भूमिका आणि उत्तरदायित्व तसेच त्यांच्या मधील परस्पर संबंधांवर पुन्हा लक्ष ठेवण्यासाठी या आयोगाची स्थापना केली आहे. तसेच केंद्र राज्य संबंधांमध्ये येणाऱ्या आव्हानांचे आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी या आयोगाने शिफारशी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली.

**भारतीय संघराज्यवाद आणि कोव्हीड-19 :-**

Covid-19 या आपत्तीच्या वेळी आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, क्षेत्रावर काय परिणाम झाला हे वारंवार मांडले गेले .परंतुया आपत्तीचा भारतातील संघराज्यावर व केंद्र-राज्य संबंधावर कसा परिणाम झाला याची मांडणी करणे आवश्यक आहे. कठिण प्रसंगाच्या काळात केंद्र-राज्य संबंधाचे नियमन करताना न्याय तत्वाचे पालन करण्याची निकड स्पष्ट करावी लागेल. सर्वसाधारण परिस्थितीत केंद्र आणि राज्य यांच्यातील मर्यादशील संघराज्य संबंधांना पक्षीय राजकारणाचे स्वरूप प्राप्त होते. हा कटू इतिहास भारतीय संघराज्याच्या संदर्भात मान्य करावा लागतो. covid-19 च्या आपत्तीच्या वेळी केंद्र सरकारकडून हे निर्णय घेतले गेले व राज्यांवर लादले गेले हे भारतीय संघराज्य ची चौकट व केंद्र-राज्य संबंध आपत्तीग्रस्त करणारे ठरतील.

राज्यातील व्यक्तींचे आरोग्य महत्वाचे आहेच. परंतु भारतीय राज्यघटनेने स्वीकारलेल्या व्यवस्थेचे आरोग्यही महत्त्वाचे आहे. ही बाब कोणत्याही आपत्ती व्यवस्थापन वेळी विसरून चालणार नाही. covid-19 च्या व्यवस्थापन करण्याच्या संदर्भात लॉक डाऊन चा निर्णय घेताना व लॉक डाऊन चे नियम आणि कार्यपद्धती निश्चित करताना राज्यांना सहभागी करून घेणे अपेक्षित होते. अशा साथच्या रोगाशी संबंधित धोरणे निश्चित करण्यामध्ये राज्यांचा सहभाग निर्णायक असणे ही संघराज्य तत्वां मधील अत्यंत प्राथमिक बाब ठरते .परंतु लॉक डाऊन चा निर्णय घेण्यापूर्वी या तत्त्वा कडे दुर्लक्षित झाल्याची नोंद करावी लागेल. त्यानंतर घटक राज्यांची झालेली तारांबळ व केंद्र-राज्य संबंधातील संघराज्याला घातक करणारी केंद्रीय प्रवृत्तीची मांडणी करावी लागेल.

लोकशाही व त्या लोकशाहीला भक्कम करणारी राजकीय व्यवस्था अतिशय दूरदृष्टीने विचार करून तयार केलेले आहे. व ती आपण स्वीकारलेली आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या नावाखाली व आपत्ती परिस्थितीला घाबरून अशी व्यवस्था मोडकळीस येणार नाही याचे भान निर्माण करणे आवश्यक आहे. केंद्र-राज्य संबंधातील पारदर्शकता ही संघराज्य व्यवस्थेला भक्कम करणारी बाब आहे. ही गोष्ट जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम या covid-19 च्या परिस्थितीतही करावेलागणार आहे.

**निष्कर्ष**:-

भारतामध्ये सहकार्यावर आधारलेली संघराज्य पद्धती स्वीकारलेली आहे.आपण अमेरिकेप्रमाणे पूर्ण संघराज्याचा स्वीकार केलेला नाही. परिणामी घटनात्मक केंद्र-राज्य संबंध अभ्यासलेअसता, केंद्र सरकार प्रबळ बनवले आहे. केंद्राचा राज्याच्या प्रशासनात वाढता हस्तक्षेप हे संघराज्या समोरील एक आव्हान आहे. केंद्र राज्यांमध्ये परस्परविरोधी सरकारे सत्तेवर येतात, तेव्हा केंद्राकडून त्या राज्यांना भेदभावाची वागणूक दिली जाते. भारतीय घटनेच्या 7 व्या परिशिष्टात केंद्र-राज्य संबंध, त्यांचे अधिकार स्पष्ट केलेले आहेत. केंद्र सुचीत पूर्वी 97 विषय होते. ती संख्या सध्या 99 वर गेली आहे. ही संख्या जास्त आहे आणि राष्ट्रीय दृष्टीने महत्त्वाच्या विषयांचा यात समावेश आहे. यावर केंद्र सरकारच कायदा करू शकतो. राज्य सूचीतील विषय ही 66 वरून 61 वर नेण्यात आले समवर्ती सूचीतील 47 विषयांवरून यादी 52 वर नेण्यात आली. यावर दोन्ही सरकारे जरी कायदे करू शकत असले तरी, ते परस्पर विरोधी असल्यास केंद्राचा कायदा श्रेष्ठ ठरतो. वरील विषयांवर खेरीज शेषाधिकार ही केंद्राकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. कलम 356 नुसार राष्ट्रपती राजवट राज्यात लागू करून तेथे केंद्राची सत्ता निर्माण केली जाते. अशा अनेक बाबी मधून भारतीय संघराज्यात स्वायत्ततेचा प्रश्न निर्माण होतो. आणि भारतीय संघराज्य पुढील हे फार मोठे आव्हान आहे. सध्या केंद्रस्थानी आणि अनेक राज्यांच्या ठिकाणी संयुक्त आघाडी सरकारे सत्तेवर आहेत. भारतीय राजकारणात प्रादेशिक पक्षांचे प्राबल्य वाढले आहे. प्रादेशिक अस्मिता, प्रांत अभिमान या गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले असले, तरी राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता अखंडता यागोष्टी नाकारून चालणार नाहीत त्यामुळे राज्या-राज्यातील ताणतणाव संघर्ष कमी करून केंद्र-राज्य संबंधाचा साकल्याने पुनर्विचार करून राज्यांची स्वायत्तता आणि स्वयंपूर्णता वाढवण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची**:-

१. राजेन्द्र व्होरा, सुहास पळशीकर, भारतीय लोकशाही अर्थ आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, न्यू दिल्ली, 2010

२. प्रा. ज्ञानदेव खळेकर, तौलानिक शासन आणि राजकारण, सक्सेस पब्लिकेशन, पुणे, 2015.

३. प्रकाश बाळ/किशोर बेडकिहाळ, भारतीय राजकीय व्यवस्था प्रक्रिया आणि स्वरूप, आंबेडकर अकादमी, सातारा, 2002

४. भारती केळकर, भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशिला, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2013.

५. डॉ. मंजिरी कारेकर/सुवर्णा बेनके, भारताचे शासन आणि राजकारण,Pearson, दिल्ली.

६. डॉ. अलका देशमुख, एकविसाव्या शतकातील बदलते समाजकारण आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर, 2010.

७. सुहास पळशीकर, समकालीन भारतीय राजकारण, प्रतिमा प्रकाशन, पुणे 2004.

८. सुहास पळशीकर, जमातवाद, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही,

९. Gupta D.C., indian government and politics

१०. गोपाळ गुरू, (संपादकीय), Economic and political weekly, Vol.55.Issue No.16, 18 April , 2020.